
# शेवडे गुरुजींच्या गोष्टी



BVBK-0402880

ओ० वी.

२८८०
९/९/८४

२८८० दिनांक ९/९/८४

# किर्तीरूपे उरावे

लेखक

रा.वा. शेवडेगरूजी

BVBK-0402880

मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि.
२५१ क शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

किर्तीरूपे उरावे

प्रकाशिका :
सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रकाशन क्रमांक ६०४
ISBN 81-85773-23-8

नवीन आवृत्ती :
१ सप्टेंबर १९९३

मुद्रक :
श्री. गिरिश जोशी
श्रीपाद ऑफसेट
शिवकृपा १९४/२ अ नवी पेठ
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ :
श्री. दीपक संकपाळ

मूल्य :
रुपये पाच मात्र

दिनांक 9/9/98

# १ प्राणपणाने खिंड लढविली

आकाश ढगांनी व्यापले होते. पाऊस धो धो पडत होता. पाऊस कमी होण्याची चिन्हे दिसत नव्हती. शिवराय सदरेवर येरझाऱ्या घालीत होते. त्यांची मुद्रा गंभीर दिसत होती. बाहेरच्या जगाचा जणू त्यांना विसर पडला होता. आत्मचिंतनात ते गर्क झाले होते. इतक्यात त्र्यंबकपंत किल्लेदार बाजी प्रभूच्यासह आल्याची त्यांना वर्दी मिळाली. दोघे आत आले. शिवरायांना त्यांनी लवून मुजरा केला. बाजी म्हणाले,

'महाराज, ऐकलं ते खरं का ?'

'काय ?'

'आपण उद्याच किल्ला सिद्दीच्या स्वाधीन करणार आहात म्हणे ?' बाजीने शंका व्यक्त केली. तिला पुष्टी देत त्र्यंबकपंत म्हणाले,

'महाराज, तसा निरोपही वकिलामार्फत गेला आहे असं समजतं.'

'पंत, आम्ही किल्ला स्वाधीन करणार आहोत, उद्या नव्हे आजच रात्री ! पण –'

'पण काय, महाराज ?'

'सिद्दीच्या नव्हे, तर तुमच्या !'

'म्हणजे ? आपल्या म्हणण्याचा आशय ध्यानी नाही आला !' बाजी गोंधळलेल्या स्थितीत म्हणाले.

'बाजी, गडावर सहा हजार सैनिक आहेत. त्यांतले तुमचे कडवे हत्यारबंद पाचशे मावळे बरोबर घ्या. आज रात्रीच आपण निघू. सकाळपर्यंत विशाळगडच्या पायथ्यापर्यंत पोहोचू.'

बाजी आणि त्र्यंबकपंत शिवरायांच्या तोंडाकडे पाहतच राहिले. ते काही विचारणार इतक्यात बहिर्जी नाईक आल्याची वर्दी शिवरायाना मिळाली.

'बोला, हेर नाईक. तुमची लाख मोलाची बातमी. ती ऐकायला आम्ही कसे जीवाचे कान करून बसलो आहोत.'

'महाराज,प्रसंग मोठा बाका आहे.आदिलशहाच्या आमंत्रणावरून उत्तरेतून प्रचंड फौजेसह शाहिस्तेखान पुण्यावर आला आहे. आपण इथं अडकून पडलात म्हणून माँसाहेब राजगडी चिंतेत आहेत.'

'धन्य बहिर्जी तुमच्या हेरचातुर्याची ! पण सिद्दी काय म्हणतो ?'

'महाराज, आपण शरण येणार म्हणून सिद्दी खुशीत आहे. त्याच्या वेढ्यात शिथिलता आली आहे. पावसामुळे पस्तावलेले सिद्दीचे सैनिक राहुटयांतच खाऊन पिऊन सुस्तावलेले आहेत. अधिकारी नाचगाण्यात दंग आहेत. ईशान्य टोकाच्या बारड माचीखाली वेढा अगदी विरळ आहे. उजाड माळावर कुठंतरी बाभळ–बोराटी दिसावी तसा.'

'विशाळगडावरील काही माहिती हाती लागली का ?'

'त्यालाही वेढा पडला आहे. पठाण मुसलमान पावसात वेढा टाकायला तयार नव्हते. पण सूर्याजी व जसवंतराव या मराठे सरदारांनी ती जोखीम आपल्या शिरावर घेतली.'

शिवराय क्रोधाविष्ठ झाले. त्यांच्या तळपायाची आग

मस्तकाला गेली. पण तो राग त्यानी मनात गिळला. शिवरायांनी वहिर्जीची पाठ थोपटली व योग्य बिदागी देऊन त्यांना निरोप दिला.

शिवराय पंताना म्हणाले,

' पंत, आम्ही गेल्यावर गड तुम्ही सांभाळायचा आहे. दोन पालख्या, दहावारा भोई पाठवून द्या. देवीदर्शन करून आम्ही मार्गस्थ होणार आहोत. '

त्र्यंबकपंतानी निरोप घेतला.बाजीप्रभू आपल्या कामगिरीवर गेले.

घटकाभराने बाजीप्रभू आपल्या पाचशे मावळ्यांसह आले. देवीदर्शन आटोपून शिवराय तयार होतेच. कर्वारनिवासिनीचे त्यानी मनात चिंतन केले. मग ते त्र्यंबकपंताना म्हणाले,

' पंत, येतो आम्ही. सांभाळा स्वतःला आणि स्वतःपलीकडे गडाला. आमची चिंता करू नका. वसुदेवाच्या आधारानं देवकी-बाळ यमुनापार झालं आणि त्यानं गोकुळ गाठलं. बाजीच्या बहादुरीवर आम्ही तसेच वेढापार होऊ आणि विशाळगड गाठू. '

शिवराय चालले. बारड माची ते उतरले. पाऊस कोसळत होता. अंधार मी मी म्हणत होता. मधून मधून वीज चमकून मार्गदर्शनाचे काम करीत होती. चिखलपाणी, काटेकुटे तुडवीत ते वेढापार झाले.

कुणी हटकले, गडबड झाली, पण पावसाच्या रिमझिमीत आणि वाऱ्याच्या गोंगाटात ती शांत झाली.

शिवराय पालखीत बसले. दुसऱ्या पालखीत शिवा काशीदाला प्रतिशिवाजीचे सोंग देऊन बसविले. शिवराय गेले. आडमार्गाने. नापिताची पालखी चालली धीरे धीरे गाडी रस्त्याने.

त्याच्याबरोबर दिले होते चार भोई व दहा–बारा मावळे.

शत्रूला जाग आली. शिवरायांच्या पलायनाची बातमी' सिद्दीच्या गुप्तहेरांनी त्याच्या कानी घातली. सिद्दी चिडला, चडफडला, चवताळला. त्याने आपल्या विश्वासू जावयास पाठलागास पाठविले. त्याने सिद्दी मसौद एक हजाराचे घोडदळ व दोन हजारांचे पायदळ घेऊन रवाना झाला.

पालखी पकडली गेली. सिद्दी मसौद आनंदला. पालखी, भोई व दहा–बारा मावळे यांना मुक्कामाला आणले. झडतीत व जाबजबान्यांत तो शिवाजी नसून शिवा नापित होता असे आढळले. फुकट वेळ गेला. त्यान चरफडत पुन्हा विशाळगडाच्या वाटेला लागला.

पहाटे घोडखिंडीत शिवराय आले. पाठीवरच्या शत्रूच्या घोड्यांच्या टापा त्यांच्या कानी आल्या. ते म्हणाले, ' बाजी, आता पुढे जाणे नको. आपण इथंच शत्रूला तोंड देऊ.'

' महाराज, हा धोका आहे. संख्येनं भारी अशा शत्रूला आपण कुठवर तोंड देणार ? हा धोका मी आपणास पत्करू देणार नाही. तीनशे मावळे घेऊन आपण विशाळगड गाठा. दोनशे मावळ्यांनिशी मी ही खिंड लढवितो.'

बाजी प्रभूंच्या स्वामिभक्तीने शिवरायांचा ऊर भरून आला. बाजींची निधड्या छाती, स्फुरणारे बाहू व आत्मविश्वास पाहून ते आपली कामगिरी चोख बजावतील याची शिवरायांना खात्री वाटली.

विचार करायला वेळ नव्हता. शिवरायांनी बाजींना प्रेमालिंगन दिले. बाजींनी मुजरा केला. शिवराय चालले.

संकटे आली म्हणजे ती सगळीकडून येतात. विशाळगडाला-

सुद्धा वेढा घातला होता. सूर्याजी व जसवंतरावाशी तिथे जबरदस्त खणाखणी झाली. मूठभर देशभक्तांची पोटार्थी देशद्रोह्यांवर सरशी झाली. शिवरायांना विशाळगडावर पोहोचायला सायंकाळ झाली.

खान सिद्धी मसौद घोडखिंडीच्या तोंडाशी आला. खिंडच ती. दोन घोडे व दहा सैनिक इतक्यांनाच पुढे सरकणे शक्य होते. दगडविटांनी, लाठ्या-काठ्यांनी, बिळच्या-कोयत्यांनी, भाला-बरच्यांनी तिरदाज मावळ्यांनी शत्रूची जबरदस्त लांडगेतोड केली; पण खवळलेल्या समुद्रासारखा शत्रू चिडलेला होता. संख्येने भारी होता. तो पुढे पुढे येऊ लागला. हातघाई जुंपली. प्रेतांचा खच पडला.

दोन्ही हातांत तलवारी घेऊन बाजी पुढे झाले. त्यांच्या अचाट लढतीने शत्रू दिपून गेला. बाजी लढले, लढले, जखमी झाले आणि अखेर कोसळले.

मावळ्यांनी बाजींना बाजूस नेले. बाजी आर्त स्वराने, रुद्ध कंठाने म्हणाले,

'मी आता यातून वाचत नाही. माझी मी पराकाष्ठा केली, पण तिकडे शिवरायांचं काय झालं असेल? परमेश्वर त्यांचं रक्षण करो.'

इतक्यात विशाळगडाच्या दिशेने तोफांचे आवाज आले. एक, दोन, तीन, चार, पाच! बाजीप्रभूंच्या रक्तबंबाळ चेहऱ्यावर रक्तकमळाचे प्रसन्न तेज चमकले. ते उद्गारले,

'शिवराय सुरक्षित आहेत. हिंदवी स्वराज्य सुरक्षित आहे. माझी सेवा कामी आली. माझ्या जीवाचं सोनं झालं.'

तोफांचे आवाज वातावरणात विरून गेले. बाजीप्रभूंची

जीवनज्योत पंचत्वात विलीन झाली. पावसाच्या संततधारेमुळ निराश होऊन सिद्दी मसौदला पन्हाळयाचा व विशाळगडाचा नाद सोडून हात चोळत परतावे लागले.

## २ शिवरायास्तव कबंध लढले

पुरंदरच्या तटावर दिलेरखानाच्या तोफा आग ओकू लागल्या. मुरारबाजींना याचा अर्थच कळेना. हल्ल्याला इतक्या लवकर तोंड द्यावे लागेल याची त्यांना कल्पना नव्हती. प्रतिकाराच्या सूचना सैनिकांना देण्यासाठी त्यानी सर्वांना बालेकिल्ल्यात बोलविले. इतक्यात हेरप्रमुख बहिर्जी नाईक आल्याची वर्दी त्यांना मिळाली. मुरारबाजींना आनंद झाला. बहिर्जी आले. मुरारबाजींना त्यानी प्रेमालिंगन दिले. मुरारबाजी अधीरतेने म्हणाले,

‘ बहिर्जी, अगदी वेळेवर आलात. ’

‘ होय, पण किल्लेदार, प्रसंग मोठा बाका आहे. ’

‘ तो कसा काय ?’

‘ वज्रगड पडला. यशवंत प्रभू व बाबाजी प्रभू दोघेही कामास आले. ’

‘ अरेरे ! फार वाईट झाले. ऐन घडीला दोन स्वामिनिष्ठ मोहरे खर्ची पडले. ’

‘ किल्लेदार, शोक करायला अवसर नाही. खान यशानं चेकाळला आहे. वीस हजार फौजेनिशी वेढा आवळत आणला

आहे. पुरंदर सर करण्याचा त्यानं निश्चय केला आहे. मांसाहेब व राजे चिंतेत आहेत. पुरंदरची त्यांना काळजी लागून राहिली आहे.'

'हेर नाईक, तातडीनं रायगडावर जा. शिवरायाना आमचा अदबीचा मुजरा सांगा. त्याना खात्री द्या की, हा मुरारबाजी जिवंत असेतो पुरंदर पडणार नाही.'

हेर नाईक निघून गेले. मुरारबाजीच्या डोळ्यासमोर शिवरायांची मूर्ती आली. मांसाहेबांचे चरण आले. मनोमन त्या चरणकमलांना वंदन करून ते सैनिकांना म्हणाले,

'मर्दांनो, ऐकलंत ना सारं?'

'जी!' पाच–पंचविसांनी हुंकार दिला.

'मग बोला तुमचा कौल!'

उत्तराचे आवाज घुमले. – आम्ही हार जाणार नाही.

– धर्मासाठी लढू.

– देशासाठी लढू.

– शिवरायासाठी लढू. पण माघार घेणार नाही.

'शाब्बास मर्दांनो, या मुरारबाजीला आता हत्तीचं बळ आलं. बोला, हर हर महादेव!'

'हर हर महादेव!' असा शिवनामाचा एकच गजर आसमंतात निनादला. सारे हत्यारबंद होऊन प्रतिकारार्थ तटाकडे गेले.

खानानं जोर केला.

माचीचा बुरूज ढासळला. शत्रू वर चढू लागला. मावळ्यांनी प्रतिकार करीत करीत बालेकिल्ल्यापर्यंत माघार घेतली. तिथून त्यांनी खणाखणीला जोर लावला.

वाढत्या संख्येने पठाण गडाकडे येत आहेत असे दिसताच

मुरारबाजीनी बालेकिल्ल्याचा दरवाजा उघडला व आघाडीवर स्वतः राहून उघड प्रतिकाराची आज्ञा मावळ्यांना केली.

घोरांदर माजले. तलवारींना तलवारी भिडल्या. भालाफेकीने उसळी घेतली. तिरंदाजांच्या तिरंदाजीला ऊत आला. 'दीन दीन' आणि 'हर हर महादेव' या घोषणांखेरीज कुणाला काहीच ऐकू येत नव्हते. मुरारबाजी आणि त्यांचे मर्द मावळे प्राणपणाने लढत पुढे आले. त्यांनी शत्रूला रोखले. मराठ्यांचा चेव आणि जिद्द पाहून शत्रूने माघार घेतली. तो पायथ्याला पळाला. मराठ्यांनी पाठलाग केला व ते दिलेरखानाच्या छावणीपर्यंत पोहोचले. खानाच्या छावणीत त्यांनी गोंधळ उडवून दिला.

खान प्रसंगावधान राखून हत्तीवर आरूढ झाला. त्याने लढाईचे अवलोकन केले. त्वेषाने लढत असलेला मुरारबाजी त्याच्या दृष्टीस पडला. मुरारबाजींची तलवार कुणाच्या छाताडात घुसत होती, कुणाची मुंडकी छाटत होती, तर कुणाचा हात वरच्यावर कलम करीत होती.

दोनशे कडव्या पठाणांनी मुरारबाजीना घेरले; पण ते काही करू शकले नाहीत. खान अवाक् झाला. त्याच्या डोक्यात एक विलक्षण कल्पना चमकून गेली. तो आपल्या सैनिकांना म्हणाला,

'ठहरो ! '

लढाई थांबली. खान मुरारबाजीना म्हणाला,

'मर्द किल्लेदारा, आम्ही तुझ्या शौर्यावर निहायत खूष आहोत. '

'तुमची खुषी मला नको

'ही लढाई थांबव. '

‘ ते शक्य नाही. ’

‘ आमच्या बाजूस ये. बादशहा तुला जहागीर देईल. ’

‘ सिंह मेलेला प्राणी खात नाही. ते काम कोल्हेकुत्रे यांचं. स्वराज्यसेवक शिवरायांची मीठभाकरी मी तुझ्या उष्ट्या पक्वान्नांपेक्षा अधिक मोलाची मानतो. ’

‘ मग मर तर. ’

‘ देशासाठी व धर्मासाठी आलेल्या मरणासारखं दुसरं यश नाही. पण ते तुला सांगून काय उपयोग ? मद्यप्याला कधी अमृताची – ’

पुन्हा लढाईला जोराने तोंड लागले. प्रेतांचा खच पडू लागला. रक्ताचे पाट वाहू लागले. खानाचा एक अचूक तीर मुरारबाजींच्या कंठात घुसला. मुरारबाजी खाली कोसळले. सैनिकांनी त्यांना सावरले, पण काही क्षणांतच शिवरायांच्या जयघोषात त्यांची प्राणज्योत मालवली.

सेनानी पडला; पण मराठे घाबरले नाहीत. उलट जोमाने जसे शीर तुटताच कबंध लढावे तसे त्यांनी शत्रूला पायथ्यापर्यंत पोहोचवले. गड सुरक्षित राखला.

सूर्य मावळला. लढाई थांबली. मुरारबाजींचे बलिदान शिवरायाना समजले. रात्रभर शिवरायांच्या डोळ्यास डोळा लागला नाही की त्यांच्या डोळ्यांतले पाणी खिळले नाही.

बाल वाङ्मय विभाग.
क्र. २८८२. दिनांक 21/1/64

# ३ आधी लगीन कोंढाण्याचे

'मांसाहेब, पुष्कळ वेळा वाटतं ...'

'काय वाटतं, राजे ?'

'जे घडतं ते बऱ्याकरिताच घडतं.'

'म्हणजे ?'

'आलमगिरानं तह मोडला. आम्ही तुफान मुलुखगिरी केली.'

'काय केलीत मुलुखगिरी ?'

'आमच्या मर्द मावळ्यांनी चार महिन्यांत सत्तावीस किल्ले स्वराज्यात सामील केले. पुरंदर तहाचा बदला घेतला. आमचा दरारा वाढला.'

'राजे, वाघाची शिकार करणं आणि हरणांचा कळप मारणं यात अंतर असतं.'

'असं का म्हणता, मांसाहेब ?'

'कोंढाण्यावर अद्याप मोगली निशाण फडफडतंय. ज्याच्या हाती कोंढाणा त्याच्या हाती पुणे परगणा. मिर्झाराजांनी उगाच नाही उदेभान राठोडला तिथं ठेवलं. तीन हजार उमदे पठाण आणि कडवे राजपूत आहेत त्याच्या दिमतीला. डोळ्यांत तेल घालून ते कोंढाण्याचं रक्षण करीत आहेत. शिवाय, कोंढाण्यावर जरीपटका फडकेपर्यंत ...'

'मांसाहेब, आपली व्यथा आम्ही जाणतो. या कामगिरीवर एखादा दमदार सरदार आम्ही पाठवू. नाहीच जमलं तर आम्ही जातीनं स्वतः जाऊ. आपण निश्चिंत असा.'

शिवराय काहीसे गंभीर झाले, सचिंत झाले. माँसाहेबांना लवकरात लवकर दुःखमुक्त करण्याचा त्यांनी निश्चय केला.

इतक्यात एक पहारेकरी आत आला. मुजरा करीत नम्रतेने म्हणाला,

'उमरठ्याचे उमराव नरवीर तानाजी मालुसरे आणि, युद्धवीर शेलारमामा भेटीस आले आहेत.'

त्यांना पाठवून देण्याची शिवरायानी आज्ञा केली. शेलार-मामा ऐंशी वर्षांचे होते. तानाजीराव तर शौर्याचा मूर्तिमंत पुतळा. ते आत आले. त्यानी शिवरायाना व माँसाहेबांना त्रिवार मुजरा केला. क्षेमकुशल संपल्यावर माँसाहेब म्हणाल्या,

'मामा, बरं येणं केलंत ?'

'तान्यानं लेकाचं लगीन काढलंय.'

'होय माँसाहेब,' तानाजीराव मध्येच म्हणाले, 'माझ्या रायबाच्या लग्नाला आपण शिवरायाना बरोबर घेऊन यायला हवं. तसं सांगूनच आलोय आम्ही साऱ्या गावकऱ्यांना.'

'येऊ येऊ, जरूर येऊ. मामा, जसा आम्हाला शिवबा, तसाच तुमचा ताना. एक राम तर दुसरा भरत. मग तुमचा नातू म्हणजे आमचाच नातू नाही का ?'

शिवरायांच्या चेहऱ्यावरचा आनंद मावळला. ते गंभीरपणे काळजीच्या सुरात म्हणाले,

'तानाजी, लग्नाला माँसाहेब आमच्या वतीनं येतील.'

'आणि आपण ?'

'आम्ही निकडीच्या कामगिरीवर जात आहोत.'

'या वेळी असली कसली निकडीची कामगिरी काढलीत, राजे ?'

' कोंढाणा कब्जात घेण्याची. रयतेचं राज्य करणं म्हणजे सतीचं वाण घेणं आहे. सुळावरची पोळी आहे ती. कोंढाण्यावाचून पुणं म्हणजे शिरावाचून शरीर. कोंढाणा सर करून येतो आम्ही तुमच्या गावाला. रायबाला आशीर्वाद द्यायला. '

चिंतेने शिवरायांच्या कपाळावर आठ्या पडल्या. तानाजीरावांच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. मामला त्वरित त्यांच्या लक्षात आला. ते निश्चयाच्या स्वरात म्हणाले,

' महाराज, आपण जातीनं स्वारीवर जाणार ? '

' होय. '

' मग आम्ही कशाला आहोत ? लाखांच्या पोशिंद्याला संकटात ढकलण्याइतका हा ताना... '

' अहो, पण तुम्ही तुमच्या मुलाचं... '

' लगीन लावणार, पण आधी कोंढाण्याचं, मग रायबाचं. कसं मामा ?'

' हेच खरं ! '

' माँसाहेब ! ' तानाजीरावांचे बाहू स्फुरण पावू लागले. आपल्या डोक्यावरचा मंदिल त्यांनी उतरला. तो जिजाऊ माँसाहेबांच्या हाती देत ते म्हणाले, ' हा मानाचा मंदिल आपल्या हातानं आपण माझ्या डोक्यावर बांधा आणि मला आशीर्वाद द्या, म्हणजे कोंढाणा जिंकलाच म्हणून समजा. '

माँसाहेबांचे डोळे भरून आले. त्यांनी तानाजीरावांना मानाचा मंदिल बांधला. ' विजयी व्हा ' असा आशीर्वाद दिला. रामाला भरत भेटावा तसे तानाजीराव शिवरायांना कडकडून भेटले. तानाजीरावांचे मित्रप्रेम व स्वराज्यनिष्ठा पाहून शिवरायाचे हृदय द्रवले. ऊर भरून आला. दाटल्या गळ्याने ते म्हणाले,

' काम फत्ते करून या. मग रायबाच्या लग्नाचा बार असा उडवू या की – '

' महाराज, येतो आम्ही ! ' तानाजीराव व शेलारमामा उमरठ्यास परत आले. सूर्याजीला त्यांनी आठशे मर्द मावळा गोळा करण्यास सांगितले.

कोंढाण्याच्या पायथ्याला येऊन त्यांनी सारा कोळीवाडा वश करून घेतला. एके सायंकाळी ते सूर्याजीला म्हणाले,

' सूर्याजी, पाचशंभर हत्यारबंद मावळा घेऊन तू कल्याण दरवाजा गाठ. '

' आणि दादा, तुमचा बेत काय ? '

' मी मावळनीचा कडा चढून वर जातो. माझ्याबरोबर तीनशे मावळे व मामा आहेत. गुपचूप खणाखणी करतो. कल्याण दरवाजा उघडून पठाण रजपूत पळून जातील. त्यांना तुम्ही कापा. '

मर्द मावळे सरासर कडा चढून वर गेले.

सूर्याजीने कल्याण दरवाजा गाठला व तिथे तो दबा धरून बसला. चढून गेलेल्या मावळ्यांनी हाणामारी सुरू केली. साऱ्या किल्ल्याला जाग आली. भारी संख्येने शत्रूचे सैनिक कामास येऊ लागले. किल्लेदार उदेभान राठोड चालून आला. तानाजीरावांची ढाल तुटली. त्यानी प्रसंगावधान राखून कमरेचा शेला हाताभोवती गुंडाळला. एकमेकांनी एकमेकांवर वर्मी घाव घातले. तानाजीराव कोसळले. त्यांच्यात उठण्याचे त्राण राहिले नाही. उदेभानही जखमी होऊन पडला. त्याने उठण्याचा प्रयत्न केला. इतक्यात शेलारमामानी आपल्या शेलक्या वाराने उदेभानला रक्ताच्या थारोळ्यात कायमचे निजवले. ते त्यांच्या लाडक्या

तानाजवळ आले; पण तानाजीरावांची प्राणज्योत मालवली होती.

सूर्याजीला दिलेली कामगिरी त्याने फत्ते केली. तो कल्याण दरवाजा काबीज करून आत आला. तानाजीराव पडल्याची बातमी त्याला कळली. धनी पडल्यामुळे भयभीत झालेल्या मावळ्यांना त्याने धीर दिला. त्यांच्यात पुन्हा वीरश्री संचारली.

पहाटेपर्यंत गड मराठ्यांच्या हाती आला. स्वराज्यात सामील झाला. शिवरायांना विजय समजावा म्हणून गवताच्या गंजी पेटविण्यात आल्या.

शिवराय दुसऱ्या दिवशी आले. तानाजीरावांच्या मृत्यूची बातमी त्याना कळली. त्यानी अपार शोक केला. शोकसागरात बुडालेल्या शेलारमामाना ते म्हणाले,

' मामा, गेला तो शिवाजी आणि हा तुमच्यासमोर तानाजी उभा आहे असं समजा. '

' राजे, वाईट तर झालं; पण जीवाचं सोनं करून गेला माझा तान्या. पावनखिंडीतले वीर बाजी आणि पुरंदरचे मुरार-बाजी स्वर्गात त्याला डोक्यावर घेऊन नाचत असतील नुसते. '

शिवरायांच्या नेत्रांतल्या सतत अश्रुधारा थांबत नव्हत्या. सूर्याजीला दुःख अनावर होऊन त्याने त्यांच्या पायांना मिठी मारली. तो स्फुंदत म्हणाला,

' महाराज, स्वराज्याचे स्वामी जर असे धीर सोडू लागले तर आधारासाठी आम्ही कुणाकडे पाहायचं ? '

' सूर्याजी, स्वराज्याचा स्वामीसुद्धा आईचा मुलगा असतो, कुणाचा जीवलग मित्र असतो, मुलाचा बाप असतो; कारण तोही हाडामांसाचा माणूस आहे. मामा, आता आपण शोक आवरू या

चला, माँसाहेबांचं सांत्वन करू या. त्यांना रायबाच्या लग्नाला नेऊ या. माँसाहेबांच्या हस्ते आम्ही रायबाला मोठी शिलेदारकी देणार आहोत.'

'माझ्या तानाची पुण्याई!' मामांचे डोळे भरून आले. 'राजे, कोंढाण्याचं लगीन आधी लावून तानानं आपला शब्द खरा केला.'

'होय मर्दांनो, गड आला, पण सिंह गेला!'

तानाजीरावांच्या बलिदानाप्रित्यर्थ कोंढाण्याचे नाव सिंहगड ठेवण्यात आले.

## ४ मरोनी मात अमर जाहले

'माँसाहेब!'

'बोला राजे, आज मन:स्थिती ठीक दिसत नाही?'

'हेरांनी आणलेली बातमी फार वाईट आहे.'

'ती कोणती?'

'सरनोबतानी सल्लूक केला आणि बहिलोलखानाला सोडून दिले.'

'राजांच्या सल्ल्याशिवाय सेनापती तह करू लागले तर अनर्थ ओढवेल.'

'माँसाहेब, आंधळ्या उदारतेपोटी आणि मनी आमचा विश्वास बाळगून त्यांनी तसं केलंही असेल.'

' पण आता तुमचं विघडलं कुठं ?'

' आमचा हुकूम होता वहिलोलला लोळवा, धुळीस मिळवा वा जीवे पकडून आमच्यासमोर हजर करा; पण त्यांची तहाची चाल पूर्ण चुकली. उद्या सरनौवत राहतील वाजूला आणि त्याची चूक भोगावी लागेल स्वराज्याला. वहिलोल संपला असता तर आदिलशहाला मुठीत नाक धरून तह करण्याखेरीज गत्यंतर नव्हतं. आमचा खरा शत्रू उत्तरेचा मोंगल आहे. त्याच्या पारिपत्याची आम्हास घाई आहे. '

जिजाऊमाँसाहेबांच्या सल्ल्याने शिवरायानी प्रतापराव गुजर सरनौवताना कडक इशारा दिला व हे अप्रिय प्रकरण कसेतरी मिटवून टाकले.

आदिलशहाच्या मुलखात शिवसैनिकांनी धुमाकूळ घातला होता. कराड, वाई, सातारा, चंदन. वंदन, नांदगिरी काबीज केली होती. पन्हाळा जिकला होता. वजीर खवासखान काळजीत पडला होता. शिवरायांच्या पारिपत्याला कुणीच तयार होईना. अखेर घमेंडखोर वहिलोलखान तयार झाला. शिवरायाना ही वातमी हेरांकडून समजली. त्यानी खानाने फौजफाटा गोळा करण्याच्या आतच त्याच्यावर सरळ हल्ला करण्याची आज्ञा प्रतापरावाना केली.

नावाप्रमाणे प्रतापरावांनी महाप्रताप करून दाखविला. ते आपली शेलकी सेना घेऊन डोण नदीपार गेले. खानाच्या तळाला वेढा दिला. त्याचे पाणीच तोडले. वेढ्याची व्यवस्था सिद्दी हिलालवर सोपवून प्रतापराव खानाच्या छावणीवर चालून गेले. हे नवे संकट पाहून पाण्याच्या चिंतेने व्याकुळ झालेल्या खानाच्या तोंडचे पाणीच पळाले. खान अगतिक होऊन शरण आला.

प्रतापरावाना त्याची दया आली. पुन्हा शिवरायांच्या वाटेला न जाण्याच्या अटीवर प्रतापरावानी खानाला सोडून दिले.

पावसाळा संपला, दसरा उजाडला. मोंगलांवर चढाई करण्याची मोहीम शिवरायानी काढली. त्यानी माँसाहेबांचा आशीर्वाद घेतला. सरनौबताना पन्हाळ प्रांती बंदोवस्ताला ठेवले. शिवराय उत्तर दिशेने चालले. दुसऱ्याच मुक्कामावर हेरांनी त्याना बातमी आणून पोहोचविली की मराठे उत्तरेकडे सरकत आहेत हे पाहून बहिलोलखानाने उठाव केला. तो नेसरी खिड पार करून कोकण गाठणार आहे. या बातमीने प्रतापराव गुजर सरनौबत थक्कच झाले. शिवरायांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यानी प्रतापरावाना जासूदामार्फत खास कागद धाडला, ' सर्प बहिलोल उलटला, तो आमचा मुलूख लुटीत आहे, रयत रंजीस आणीत आहे. त्याला रणी गाठा. बुडवून टाका ना तरी तोंड न दाखविणे. '

खलिता वाचून प्रतापराव पश्चात्तापाने दग्ध झाले. त्यांची घोडचूक त्यांच्या ध्यानी आली. खानाच्या गोटात जाऊन त्याच्या नरडीचा घोट घेण्याचा त्यानी निश्चय केला.

सरनौबत फौज घेऊन नेसरीपासून काही कोसांवर दबा धरून बसले. खान नेसरी खिडीत आल्याचे समजले. त्यानी सहा शूर सरदारांना बोलावून घेतले. हल्ल्याची कल्पना समजावून सांगितली. पहाटेच्या प्रहरी त्यानी सरदारांना उठविले.

सहा सरदार आणि सरनौबत स्वत: असे सात वीर घोड्यांवर स्वार होऊन खानावर चालून गेले. त्यांनी खानाला खिडीत गाठले. अपमानाच्या खिन्नतेत आणि सुडाच्या चिडीत त्यांना विवेक राहिला नाही. फौजेला आगेकूच करण्याचा इशारा

द्यायचा राहून गेला. खानाची पठाण अफगाणाची अफाट सेना होती. कितीही कापाकापी केली तरी असीम सिंधूपुढे सात बिंदूंचे काय चालणार ? महापुरात गोपुरे बुडून जावीत तसे सात मराठे महावीर स्वराज्याच्या कामी आले.

शिवराय हळहळले. उद्गारले,

‘अखेर तोंड न दाखविणे हे रावांनी अशा प्रकारे खरे केले तर ! छे, छे ! आम्ही इतके कडक व्हायला नको होते; पण स्वराज्याचा सुविचार मनी बळावला की . जाऊ द्या ...’

BVBK-0402880